# MEDIA CORNER 2020-21

## SHRIRAM KALA MAHILA MHAVIDYALAYA, DHAMNAGON RLY

### ऑनलाइन विद्यापीठ परीक्षा संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

#### श्रीराम कला महिला महाविद्यालयाचा उपक्रम

**(कमल छांगाणी)**

धामणगाव रेल्वे दि. २४ : श्रीराम कला महिला महाविद्यालयात नुकतीच ऑनलाईन परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. कोरोना संसर्गामुळे विद्यापीठाच्या सर्व परिक्षा प्रलंबित होत्या मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार आता ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होऊ घातलेली आहे. विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा कशी राहणार यासंदर्भात विद्यार्थ्यांसोबत चर्चा करणे, माहिती पोहोचणे महत्त्वाचे होते.,आणि म्हणूनच विषयाचे महत्त्व पाहता प्राचार्य डॉ गणेश टाले यांनी यासंदर्भात परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्याची सूचना महाविद्यालयातील संबंधित घटकांना दिली, म्हणून याकरिता विशेष अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ योगेश काशीकर यांनी केले, तर परीक्षेसंदर्भात संपूर्ण माहिती प्राचार्य डॉ गणेश टाले यांनी दिली., यावेळी प्रत्येक पेपर हा ९० मिनिटांचा असणार आहे. सर्व प्रश्न बहुपर्यायी असतील, ज्या अभ्यासक्रमाचे पाच विभाग आहेत त्यांना पन्नास प्रश्न, ज्यांचे सहा विभाग आहेत त्यांना सारे प्रश्न , आणि ज्यांना चार विभाग आहेत त्यांच्या करता ४० प्रश्न विचारले जाणार आहेत. यापैकी प्रत्येक विद्यार्थिनीला ५०% प्रश्न सोडवायचे आहेत. परीक्षेमध्ये मिळालेले गुण आणि अंतर्गत मूल्यमापन मध्ये मिळालेले गुण यांच्या मिळून विद्यार्थ्यांना यावेळी गुणांकन होणार आहे. सोबत परीक्षेचे स्वरूप, परीक्षेचे मूल्यांकन येणाऱ्या अडचणी, गुणांकन कशाप्रकारचे असणार , अशा विविध विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली, यावेळी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये अनेक प्रकारच्या परीक्षेसंदर्भात शंका होत्या विविध विद्यार्थिनींनी विविध प्रश्नांना द्वारे आपल्या शंका दूर करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी देखील उत्तम प्रतिसाद यावेळी तिला. अंतिम वर्षाच्या ६० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत द्वारा ऑनलाइन पद्धतीने जोडल्या गेल्या होत्या.

याचा फायदा महाविद्यालयातील व परिसरामधील बहुतेक बीए भाग ३ च्या सर्व विद्यार्थ्यांना झालेला आहे. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

---

महिने पुरेल असा पाणीपुरवठा होण्यासाठी आराखडा तयार करावा, असे निर्देश जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दिले. शुक्रवारी येथील सिंचन भवनात कडू यांनी जलसंपदा विभागाच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी मुख्य अभियंता अनिल बहादुरे, अ. ल. पाठक, अधीक्षक अभियंत आशीष देवगडे, रश्मी देशमुख, नरेंद्र तायडे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील नांदगावपेठ येथील ३२ गावांच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्रातूनच या गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश देऊन त्यांनी बुलडाणा जिल्ह्यातील जिगाव,



आढावा घेताना राज्यमं

खडकपूर्णा आणि पेनटाक जाणून घेतली. या प्रकल्प होणे अपेक्षित आहे, याबा यात बुलडाणा येथील भू देण्यात यावे. भूसंपादन ४०० कोटी रुपयांचा नि प्रस्ताव सादर करण्यात वेगाने पूर्ण व्हावेत. यास

### श्रीराम महिला महाविद्यालयाद्वारे कपडे, अन्नधान्य वाटप

**धामणगाव रेल्वे, २१ मार्च**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दरवर्षी नवनवीन उपक्रम हाती घेतले जातात. यावर्षी देखील समाजामधील वंचित घटक, गोरगरिबांना कपडे आणि अन्नधान्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. याकरिता महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक ग्राम जळगाव येथील वंचित पारधी बेड्याची निवड केली.

कोरोना महामारच्या पार्श्वभूमीवर आज अनेक रोजगाराची साधने कमी झालेली आहेत. म्हणूनच अशा गोरगरिबांकरिता 'मदतीचा एक हात पुढे' या कार्यक्रमांतर्गत कपडे, अन्नधान्य यांचे वाटप करण्यात आले. जळगाव आर्वी हे गाव राष्ट्रीय सेवा योजना पथकाने तीन वर्षांकरिता दत्तक घेतलेले आहे. याकरिताच या गावांमध्ये दरवर्षी असे विविध उपक्रम या विभागाकडून राबविले जातात. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. गणेश टाले, सरपंच सत्यभामा कांबळे, मंगेश भुजबळ, प्रा. अभिजित दोड, डॉ. नंदकिशोर राऊत, प्रा. नितीन बिहाडे, नागोराव पंचबुद्धे, प्रफुल्ल कांबळे, प्रतीक्षा धोटे व बहुसंख्य गावकरी उपस्थित होते.

*(तभा वृत्तसेवा)*

### वन्यजीव रक्षकांचे पक्षी बचाव अभियान

**नांदगाव खंडेश्वर, २१ मार्च**

बाब लक्षात घेऊन शिरपूर येथील

आपलं अमरावती
तरुण भारत

महत्त्वाचे

## श्रद्धा भोगे गुणवत्ता यादीत

**धामणगाव रेल्वे** : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयाची



विद्यार्थिनी श्रद्धा वंदेश भोगे ही संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या एम ए मराठी विषयाच्या गुणवत्ता यादीत आली आहे. तिच्या यशाबद्दल श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आमदार अरुण अडसड, आमदार प्रताप अडसड, सचिव घनश्याम मेश्राम, अशोक पनपालीया, प्राचार्य डॉ. गणेश टाले, प्रा. सुवर्णा घोपे, यासह सर्व संचालक मंडळ, प्राध्यापक वर्ग, यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# प्रा. नंदकिशोर राऊत को आचार्य उपाधि



**संवाददाता, 1 दिसंबर**

**धामणगांव रेलवे-** स्थानीय महिला कला महाविद्यालय के समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकिशोर राऊत को संत गाड़गेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा आचार्य उपाधि से सम्मानित किया गया है. उन्होंने प्रा. डॉ. दया पांडे के मार्गदर्शन में महाराष्ट्र की अनुसूचित जाति के पारधी समाज का अध्ययन इस विषय पर प्रबंध प्रस्तुत किया. प्राचार्य डॉ. गणेश टाले ने प्रा. डॉ. नंदकिशोर राऊत का अभिनंदन किया है. डॉ. राऊत सफलता का श्रेय संस्था के अध्यक्ष अरुण अड़सड़, विधायक प्रताप अड़सड़, सचिव घनश्याम मेश्राम, अशोक पनपालिया, माता-पिता व दोस्तों को देते हैं.



नंदकिशोर राऊत यांचा सन्मान करताना संस्थेतील मान्यवर

# प्रा. राऊत यांना आचार्य पदवी

◆ **धामणगाव रेल्वे, ७ डिसेंबर** येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नंदकिशोर राऊत यांनी नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामधून 'महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील पारधी समाजाचे अध्ययन' या विषयामध्ये आचार्य पदवी मिळविली आहे.

त्यांच्या मार्गदर्शक म्हणून अमरावतीच्या भारतीय महाविद्यालयाच्या समाजशास्त्रभ विभाग प्रमुख प्रा. डॉ. दया पांडे या होत्या. राऊत यांनी पारधी समाजाच्या असंख्य बेड्यांना भेट देऊन पारधी समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे प्रत्यक्षात अध्ययन करून आपल्या संशोधना मध्ये त्याचा समावेश केला आणि पारधी समाजाचे वास्तव जगासमोर मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

त्यांच्या संशोधनामुळे निश्चितच पारधी समाजाच्या विकासाची दिशा निश्चित करण्याला दिशा आणि गती मिळेल. प्राध्यापक राऊत हे नेहमीच वंचित घटकांच्या विकासाकरिता प्रयत्नरत असतात. याकरिता महाविद्यायातर्फे प्राचार्य डॉ. गणेश टाले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

ते आपल्या यशाचे श्रेय संस्था अध्यक्ष आ. अरुण अडसड, आ. प्रताप अडसड, सचिव घनश्याम मेश्राम, अशोक पनपालिया, आईवडील, आपले मित्र व सर्व सहकाऱ्यांना देतात. त्यांनी मिळविलेल्या यशाचे कौतुक होत आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# डॉ. नंदकिशोर राऊत यांना आचार्य पदवी



**धामणगाव रेल्वे** : स्थानिक कला महिला महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. नंदकिशोर राऊत यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती मधून महाराष्ट्रातील अनुसूचित जाती मधील पारधी समाजाचे अध्यन या विषयामध्ये आचार्य पदवी मिळविली आहे. त्यांचे मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक डॉ. दया पांडे या होत्या. राऊत यांनी पारधी समाजाच्या असंख्य बेड्यांना भेट देऊन पारधी समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे प्रत्यक्षात अध्ययन करून आपल्या संशोधना मध्ये त्याचा समावेश केलेला आहे. .याकरिता महाविद्यायातर्फे प्राचार्य डॉ गणेश टाले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

# Principal Dr. Ganesh Tale passes away



**Dhamangaon Railway 24 (NAGPUR POST/DC):** A large number of corona positive cases and casualties are coming up day by day and the situation is getting increasingly worse day by day. Principal of Shriram Mahila Mahavidyalaya, Dr. Ganesh Tale died at an Amravati hospital due to suffering from corona. Dr. Ganesh Tale, Principal of Shriram College and Senate Member of Sant Gadge Baba Amravati University, litterateur, Poet, Writer had been down with corona for the last five days. He is survived by two children and a large number of other family members.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
SOCIAL MEDIA EDITION
दि. २४ एप्रिल २०२१

### कोरोनाने घेतला आणखी एक बळी

# गणेश टाले यांचे निधन

**धा.रेल्वे दि.२६|प्रतिनिधी**



जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथील श्रीराम महाविद्यालयाचे प्राचार्य व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य,साहित्यिक कवी,लेखक डॉ गणेश टाले यांचे कोरोणा आजाराने सुपर स्पेशालिटी रुग्णालयात निधन झाले आहे. ते आपल्या मागे बराच आप्त परिवार सोडुन गेले आहे.